(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

**मुंबई उच्च न्यायालयात**

**सर्वसाधारण मूळ दिवाणी अधिकारीता**

**रिट याचिका क्र. ३१५९/ २०१९**

गीता पी. कामत, सज्ञान, भारतीय रहिवासी,

सध्याचा पत्ता - प्लॉट क्रमांक 69, लक्ष्मी गृह,

फ्लॅट क्रमांक ७०१, ७ वा मजला, हिंदू कॉलनी,

लेन क्रमांक 1, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४. .... याचिकाकर्ती

विरूध्द

१. प्राप्तिकर विभागाचे प्रधान आयुक्त- १० ,

कार्यालयीन पत्ता - आयकर भवन

महर्षी कर्वे मार्ग, मुंबई - ४०० ०२०.

२. आयकर अधिकारी - १० (१) (३),

कार्यालयीन पत्ता - आयकर भवन

महर्षी कर्वे मार्ग, मुंबई - ४०० ०२०.

४. सचिवांमार्फत केंद्र सरकार,

महसूल विभाग, अर्थ मंत्रालय, भारत सरकार,

नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली- ११० ००१. ... उत्तरवादी

सह

रिट याचिका क्र. ३१५९/ २०१९ मधील

अंतरिम अर्ज क्रमांक ७५२/ २०१९.

**<u>यामधील प्रकरणामध्ये</u>**

गीता पी. कामत, सज्ञान, भारतीय रहिवासी,

सध्याचा पत्ता - प्लॉट क्रमांक 69, लक्ष्मी गृह,

फ्लॅट क्रमांक ७०१, ७ वा मजला, हिंदू कॉलनी,

लेन क्रमांक 1, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४. .... याचिकाकर्ती

विरूध्द

१. प्राप्तिकर विभागाचे प्रधान आयुक्त- १० ,

कार्यालयीन पत्ता - आयकर भवन

महर्षी कर्वे मार्ग, मुंबई - ४०० ०२०.

२. आयकर अधिकारी - १० (१) (३),

कार्यालयीन पत्ता - आयकर भवन

महर्षी कर्वे मार्ग, मुंबई - ४०० ०२०.

४. सचिवांमार्फत केंद्र सरकार,

महसूल विभाग, अर्थ मंत्रालय, भारत सरकार,

नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली- ११० ००१. ... उत्तरवादी

* * * *

याचिकाकर्तीचे वकील, पिडीएस लीगल यांच्या सूचनेवरून श्री. मधुर अग्रवाल, श्री. फेनिल भट्ट, श्री जस संघवी आणि श्री. विराज वाय भाटे यांच्यासोबत श्री. जे. डी. मिस्त्री, वरिष्ठ वकील.

श्री सुरेश कुमार उत्तरवादींचे वकील

* * * * *

न्यायमंच : धीरज सिंह ठाकूर आणि

अभय आहुजा, न्या. न्या.

अधिघोषित केले : दिनांक २० फेब्रुवारी, २०२३.

**न्यायनिर्णय**

**धीरज सिंह ठाकूर, न्या. यांच्याद्वारे**

१. याचिकाकर्तीने प्राप्तिकर कायदा, १९६१ (कायदा) च्या कलम १७९ अन्वये, आयकर अधिकाऱ्यांनी दिनांक २२ डिसेंबर २०१७ रोजी पारित केलेल्या आदेशास, ज्याद्वारे २००८-०९ आणि २००९-१० या निर्धारण वर्षांकरिता मेसर्स कैझन ऑटोमेशन प्रायव्हेट लिमिटेड (केएपीएल) या कंपनीकडून देय असलेल्या कथित कराकरिता याचिकाकर्तीस जबाबदार धरण्यात आले, त्यास आव्हान दिले आहे. प्रस्तुत याचिकेमध्ये प्राप्तिकर विभाग, मुंबई येथील प्रधान आयुक्त यांच्या कायद्याच्या कलम २६४ अन्वये पुनरीक्षण याचिका फेटाळण्याच्या

दिनांक १८ मार्च २०१९ रोजीच्या आदेशालासुद्धा आव्हान देण्यात आले आहे.

२. थोडक्यात नमूद केलेली महत्त्वाची वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे :

२.१ कायद्याच्या कलम १७९ अन्वये दिनांक १२ जानेवारी २०१७ रोजीची कारणे दाखवा नोटीस याचिकाकर्तीवर बजावण्यात आली, ज्याद्वारे निर्धारिती कंपनी तिच्या उपलब्ध पत्त्यावर आढळून आली नसल्याने आणि तसेच उपलब्ध निधी अपुरा असल्यामुळे बँकेच्या खात्यांवर टांच आणूनही देय कर वसूल होऊ शकत नसल्यामुळे संचालक या नात्याने याचिकाकर्तीविरुद्ध वसुलीची कार्यवाही का सुरू करण्यात येऊ नये याची कारणे याचिकाकर्तीस देणे आवश्यक होते. अशा प्रकारे रुपये १४०४.४२ लाख एवढी रक्कम याचिकाकर्तीकडून वसूल करण्याची मागणी केली होती.

२.२ दिनांक २३ ऑक्टोबर २०१७ रोजीच्या कारणे दाखवा नोटिशीला उत्तर देताना देय कराची वसुली न करणे याचा संबंध कंपनीच्या कारभारासंदर्भात याचिकाकर्तीकडून झालेल्या पूर्णतः दुर्लक्ष, अपकार्य किंवा कर्तव्यभंग या बाबींशी जोडता येणार नाही हे सिद्ध करण्यासाठी याचिकाकर्तीने अशी भूमिका घेतली की, याचिकाकर्तीस कंपनीची संचालक या नात्याने केएपीएल च्या फायद्यासाठी विशिष्ट प्रकारे काम करण्याची कोणतीही मोकळीक, अधिकार किंवा स्वातंत्र्य नव्हते आणि कंपनीच्या कारभारावर तिचे कोणत्याही प्रकारे नियंत्रण नव्हते. असे नमूद करण्यात आले की, याचिकाकर्तीस स्वतंत्रपणे एखाद्या धनादेशावर स्वाक्षरी करण्याचे, कंपनीच्या वतीने एखादा निर्णय घेण्याचे कोणतेही अधिकार नव्हते किंवा केएपीएल ने याचिकाकर्तीस आपले

कर्तव्य पार पाडण्यासाठी कोणतेही कार्यात्मक नियंत्रण अथवा अवकाश दिले नव्हते. असेही नमूद करण्यात आले होते की, याचिकाकर्तीकडे कोणतीही कार्यात्मक जबाबदारी देण्यात आली नव्हती आणि तिला किंवा तिचे पती श्री प्रकाश कामत, जे कंपनीचे भागधारक आणि संचालक होते, त्यांनासुद्धा केएपीएल मधून कोणीही माहिती देत नव्हते.

३. याचिकाकर्तीकडे कार्यात्मक नियंत्रण आणि निर्णय घेण्याचे अधिकार नव्हते हे विशद करण्यासाठी कारणे दाखवा सूचनेच्या सदर उत्तरांमध्ये काही तपशील नमूद केले होते.त्या संदर्भात प्रस्तुत याचिकेमध्ये दृढ कथन सुद्धा करण्यात आले आहेत. सुस्पष्टतेसाठी त्याकडे थोडक्यात निर्देश करणे योग्य ठरेल.त्यामुळे निर्धारिती कंपनी स्थापन करण्यामागील आणि त्या संदर्भात विविध संस्थांमध्ये करण्यात आलेले करारनामे यामागील पार्श्वभूमी सुद्धा देता येईल.

**<u>थोडक्यात पार्श्वभूमी :</u>**

४. याचिकाकर्तीचे पती श्री. प्रकाश कामत यांनी बेस्ट, मध्य आणि पश्चिम उपनगरी रेल्वे इत्यादी विविध सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांमध्ये वापरता येण्यासाठी स्मार्ट कार्ड आधारित उपाययोजना विकसित केल्याचे सांगण्यात आले आहे. याचे यशस्वीरित्या प्रयोग करण्यात आले आणि श्री. प्रकाश कामत आणि बेस्ट आणि मध्य रेल्वे यांच्यामध्ये सन २००६ मध्ये करारनामा करण्यात आला.

बेस्ट आणि रेल्वे यातील प्रकल्प हे 'बांधा-वापरा-हस्तांतरित

करा' या तत्त्वावर कार्यान्वित करण्यात आले आणि त्याकरिता प्रारंभीची गुंतवणूक म्हणून रुपये ५० ते ६० कोटी इतक्या निधीची आवश्यकता होती.खलीज फायनान्स अँड इन्व्हेस्टमेंट ( यापुढे केएफआय असे संबोधण्यात आले आहे.) या बहारीन येथील नोंदणीकृत कंपनीने सदर प्रकल्पात काही अटींवर गुंतवणूक करण्याची तयारी दर्शवली, ज्या द्वारे सदर प्रकल्प चालवण्यासाठी एखाद्या विशेष उद्दिष्ट उपकंपनीचा समावेश करावयाचा होता. परिणामी, दिनांक ३० मार्च २००६ रोजी केएपीएल चा समावेश करण्यात आला. केएफआय ने तिच्या एएफसी सिस्टीम लिमिटेड ( यापुढे एएफसी असे संबोधण्यात आले आहे) या मॉरिशस स्थित कंपनीद्वारे सदर प्रकल्पात गुंतवणूक केली.

श्री. प्रकाश कामत, याचिकाकर्ती, के एफ आय आणि के ए पी एल या सदर कंपनी मध्ये दिनांक २१ जून, २००६ रोजी संयुक्त उपक्रम करारनामा, दिनांक २१ जून, २००६ रोजी तारणपत्र, आणि जून, २००६ मध्ये रद्द न करता येण्याजोगे मुखत्यारपत्र करण्यात आले.

५. याचिकाकर्तीतर्फे विद्वान वकील श्री. मिस्त्री यांनी संयुक्त उपक्रम करारनाम्या मधील काही खंडांकडे निर्देश केला.असे सांगण्यात आले की अनुच्छेद ७ मधील खंड ७.२.१ नुसार जेव्हीसी चा लेखापरीक्षक हे

गुंतवणूकदाराने म्हणजेच जेव्हीसी मधील ५० टक्के भाग केएफआय धारण करीत आहे तोपर्यंत बहुसंख्या भागधारक संचालकांनी नामनिर्देशित करणे आणि मंडळांनी नियुक्त करणे आवश्यक आहे.अनुच्छेद ७ मधील खंड ७.२. २ असे दर्शवितो की जे व्ही सी मधील अंतर्गत लेखापरीक्षक हे गुंतवणूकदारांनी नामनिर्देशित करणे आवश्यक आहे. अनुच्छेद ८ मधील खंड ८.१ कडे हे दर्शविण्यासाठी निर्देश करण्यात आला की, ज्या अधिकारांचा वापर जेव्हीसी ने केला असता आणि ज्या बाबी जेव्हीसी ने केल्या असत्या अशा सर्व अधिकारांचा वापर मंडळाने करण्याकरिता आणि अशा सर्व बाबी मंडळाने पार पाडण्याकरिता जेव्हीसी चे व्यवस्थापन मंडळाकडे निहित करावयाचे होते.मंडळाच्या सर्वाधिक संख्येमध्ये आठ संचालक होते, ज्यापैकी सहा केएफआय चे होते ही बाब ठळकपणे निदर्शनास आणण्यासाठी अनुच्छेद ८ मधील खंड ८.२.१ वर भिस्त ठेवण्यात आली.मंडळाचे अध्यक्ष हे नेहमीच गुंतवणूकदारांनी नामनिर्देशित केलेल्या संचालकांमधून असणे आवश्यक होते हे दर्शवण्यासाठी खंड ८.४ कडे निर्देश करण्यात आला आणि अंतिमतः जोवर गुंतवणूकदाराकडे तिच्या एकूण भरणा झालेल्या भाग भांडवला पैकी ५० % पेक्षा अधिक भाग भांडवल आहे त्या कालावधीपर्यंत मंडळाचे निर्णय साध्या बहुमताने घेणे आवश्यक होते हे दर्शवण्यासाठी अनुच्छेद ८ खंड ८.५.४ कडे निर्देश करण्यात आले.

६. कारणे दाखवा नोटीशीच्या उत्तरामध्ये याचिकाकर्तीने ही बाब सुद्धा नमूद आणि अधोरेखित केली होती की जानेवारी २००९ पासून एस एफ आय सोबत उद्‌भवलेल्या काही मतभेदांमुळे यातील याचिकाकर्तीसह याचिकाकर्तीच्या

पतीला माहे सप्टेंबर २००९ मध्ये केएपीएलच्या व्यवस्थापकीय संचालक पदावरून काढून टाकण्यात आले. असेही नमूद करण्यात आले की, २००७-०८ या आर्थिक वर्षात जरी याचिकाकर्ती संचालक म्हणून कार्यरत होती, तरी याचिकाकर्तीस माहे सप्टेंबर २००९ मध्ये संचालक पदावरून काढून टाकले असल्यामुळे, २००८-०९ हे आर्थिक वर्ष आणि संबंधित २००९-१० या करनिर्धारण वर्षांमधील केएपीएल च्या दायित्वासाठी तिला जबाबदार धरले जाऊ शकत नाही. असेही नमूद करण्यात आले की, याचिकाकर्तीस काढून टाकेपर्यंत तिला केएपीएल द्वारे कोणत्याही प्रकारचे करदायित्व देय होते या गोष्टीची काहीच कल्पना नव्हती आणि म्हणून असे नमूद करण्यात आले की कंपनीच्या कारभारा संदर्भात तिच्याकडून कोणत्याही प्रकारचे पूर्ण दुर्लक्ष, अपकार्य किंवा कर्तव्यभंग झाल्याबद्दल तिला दोषी मानता येणार नाही.

७. कायद्याच्या कलम १७९ अन्वये निर्धारण अधिकारी यांनी दिनांक २२ डिसेंबर २०१७ रोजी पारित केलेल्या आक्षेपित आदेशाद्वारे याचिकाकर्तीचे म्हणणे नामंजूर केले. असा निर्णय देण्यात आला की, २००७-०८ आणि २००८-०९ या आर्थिक वर्षांत याचिकाकर्तीचा कंपनीच्या कारभारात सक्रिय सहभाग नव्हता हे सिद्ध करण्यात ती अपयशी ठरली आणि तिच्याकडून कोणत्याही प्रकारचे पूर्ण दुर्लक्ष, अपकार्य किंवा कर्तव्यभंग झाले नसल्याचे सिद्ध करण्यात ती अपयशी ठरली. निर्धारण अधिकाऱ्यांनी असा निर्णय दिला की श्रीमती कामत यांना माहे सप्टेंबर २००९ मध्ये कंपनीमधून काढून टाकेपर्यंत त्यांचा कंपनीच्या दैनंदिन कारभार सक्रिय सहभाग होता की ही बाब निस्संदेह आहे.याचिकाकर्ती

आणि के एफ आय यांच्यामधील वादा संदर्भात निर्धारण अधिकाऱ्यांनी असा निर्णय दिला की, एखाद्या उपक्रमाच्या कार्यात अशा प्रकारचे वाद उद्भवणे साहाजिक आहे.

८. कायद्याच्या कलम १७९ अन्वये दिनांक २२ डिसेंबर २०१७ रोजी पारित केलेल्या आदेशाविरुद्ध याचिकाकर्तीने कायद्याच्या कलम २६४ अन्वये पुनरीक्षण याचिका दाखल केली आणि याचिकाकर्ती संबंधित निर्धारण वर्षाकरिता संचालक असल्यामुळे जबाबदार होती केवळ या कारणास्तव ती सुद्धा दिनांक १८ मार्च २०१९ रोजीच्या आदेशाद्वारे फेटाळून लावण्यात आली.

९. याचिकाकर्तीतर्फे विद्वान वरिष्ठ वकील श्री. मिस्त्री यांनी अशी विनंती केली की, कायद्याच्या कलम १७९ अन्वये आदेश पारित करताना निर्धारण अधिकाऱ्यांचा पूर्ण दृष्टिकोन अनाठायी होता आणि त्या आदेशाविरुद्ध याचिकाकर्तीने दाखल केलेली पुनरीक्षण याचिका फेटाळताना पुनरीक्षण प्राधिकार्यांनी ती चूक कायम ठेवली. **मगनभाई हंसराजभाई पटेल विरुद्ध सहाय्यक प्राप्तिकर अधिकारी आणि अन्य एक**[1] **तसेच रामप्रकाश सिंगेश्वर रुंगटा आणि इतर विरुद्ध प्राप्तिकर अधिकारी**[2] या प्रकरणांमध्ये दिल्या गेलेल्या न्यायनिर्णयांवर भिस्त ठेवण्यात आली.

१०. अशी विनंती करण्यात आली की ज्याअर्थी निर्धारण अधिकाऱ्यांनी अभिलेखावर उपलब्ध असलेल्या वस्तुस्थितीवर आधारित पारित केलेला आदेश विपर्यस्त होता, २००७-०८ आणि २००८-०९ या निर्धारण वर्षांमधील कंपनीच्या दायित्वाबद्दल याचिकाकर्तीकडून वसुली करण्यासाठी याचिकाकर्ती विरुद्ध

1 [२०१३] ३५३ आयटीआर ५६७ (गुजरात)

2 [२०१५] ३७० आयटीआर ६४१ (गुजरात)

कायद्याच्या कलम १७९ अन्वये कोणतीही कार्यवाही सुरू करता येणार नाही.अशी विनंती करण्यात आली की, याचिकाकर्ती ही कंपनीची व्यवस्थापकीय संचालक नव्हती आणि त्यामुळे तिच्याकडे कारभाराची धुरा नव्हती आणि तिला कंपनीच्या वतीने कोणताही निर्णय घेण्याचे स्वतंत्र अधिकार अथवा स्वतंत्र कार्यात्मक अधिकार नव्हते हे दर्शवण्यासाठी याचिकाकर्तीने जरी पुरेसे कागदपत्र अभिलेखावर सादर केले तरीही निर्धारण अधिकारी यांनी निर्णय दिला की कंपनीच्या कारभारासंदर्भात याचिकाकर्तीकडून पूर्ण दुर्लक्ष, अपकार्य किंवा कर्तव्यभंग घडले नाही हे सिद्ध करण्यात ती अपयशी ठरली.

353 आयटीआर 567 (गुजरात) 2 [2015] 370 आयटीआर 641 (गुजरात)

११. उत्तरादाखल महसूल विभागाने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात या बाबीचा पुनरुच्चार करण्यात आला की याचिकाकर्ती ही करपात्र कंपनीची महत्त्वाची कार्यकारी संचालक होती आणि कंपनीचा दैनंदिन कारभार चालवण्यासाठी तिच्यावर अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपविल्या होत्या आणि कंपनीचे दैनंदिन व्यवहार पार पाडण्यामध्ये तिचे कोणतेही महत्त्वाचे स्थान नव्हते हा तिचा दावा चुकीचा आहे. निर्धारण अधिकाऱ्यांनी उल्लेख केलेल्या मंडळाच्या सभेच्या कार्यवृत्ताच्या आधारे हे विधान केल्याचे सांगण्यात आले होते. म्हणून अशी विनंती करण्यात आली की, कायद्याच्या कलम १७९ अन्वये याचिकाकर्ती विरुद्ध योग्य प्रकारे कार्यवाही सुरू करण्यात आली होती.

१२. पक्षकारांच्या विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकले.

१३. कायद्याचे कलम १७९ इतर गोष्टींबरोबरच याही बाबीचा विचार करते की, जेव्हा एखाद्या खाजगी कंपनीकडून एखाद्या मागील वर्षाच्या एखाद्या उत्पन्नाबाबत देय असलेली देणी वसूल होऊ शकत नाहीत, तेव्हा संबंधित मागील वर्षातील खाजगी कंपनीचा संचालक असलेली प्रत्येक व्यक्ती कोणत्याही वेळेस अशा कराचे प्रदान करण्यास संयुक्तपणे आणि पृथकपणे जबाबदार असेल, जोवर सदर व्यक्ती हे सिद्ध करत नाही की वसुली न होणे या बाबीचा संबंध कंपनीच्या कारभारासंदर्भात त्या व्यक्तीकडून झालेल्या पूर्ण दुर्लक्ष, अपकार्य किंवा कर्तव्यभंग या बाबींशी जोडता येणार नाही. म्हणून त्यात पुढे असे नमूद केले आहे की जर खाजगी कंपनीकडून देय कर वसूल करणे शक्य नसेल तर, संबंधित मागील वर्षात खाजगी कंपनीमध्ये कोणत्याही वेळेस संचालक पदावर असलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून सदर कराची रक्कम वसूल करता येईल. परंतु जर संचालकाने असे सिद्ध केले की, वसुली न होणे याचा संबंध कंपनीच्या कारभारासंदर्भातील पूर्ण दुर्लक्ष, अपकार्य किंवा कर्तव्यभंग या बाबींशी जोडता येणार नाही तर, असा संचालक स्वतःला यातून मुक्त करू शकतो.

१४. जिथे या कलमाच्या पहिल्या भागाच्या आवश्यकतेचा संबंध आहे, तिथे कायद्याच्या कलम १७९ अन्वये पारित केलेल्या आदेशावरून असे दिसून येते की मेसर्स कैझन ऑटोमेशन प्रायव्हेट लिमिटेड ( केएपीएल) या कंपनीकडून वसुली करण्यासाठी पावले उचलली गेली होती, ज्यामध्ये कंपनीच्या बँक खात्यावर टांच आणण्याचा समावेश आहे. परंतु त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही. निर्धारण अधिकाऱ्यांकडे उपलब्ध असलेल्या पत्त्यांवर कंपनी आढळून

आली नसल्याचे सुद्धा सांगण्यात आले आहे आणि म्हणून निर्धारण अधिकाऱ्यांनुसार कायद्याच्या कलम १७९ अन्वये कंपनीच्या संचालकांविरुद्ध कार्यवाही करण्याचा एकच उपाय शिल्लक राहिला.

१५. याचिकाकर्तीची भूमिका अशी आहे की ज्याअर्थी कंपनीच्या कारभारा संदर्भात तिच्याकडून पूर्ण दुर्लक्ष, अपकार्य किंवा कर्तव्य भंग झालेले नाही, त्याअर्थी तिच्याविरुद्ध कार्यवाही करता येणार नाही. परंतु निर्धारण अधिकाऱ्यांनी हे विधान अमान्य केले. या बाबीवर भर देण्यात आला की, याचिकाकर्तीला किमान माहे सप्टेंबर २००९ मध्ये कंपनीमधून काढून टाकण्याच्या दिनांकापर्यंत तिचा कंपनीच्या कारभारात सक्रिय सहभाग होता आणि कंपनीच्या कारभारासंदर्भात तिच्याकडून पूर्णतः दुर्लक्ष, अपकार्य किंवा कर्तव्यभंग झालेला नाही हे सिद्ध करण्यात ती अयशस्वी ठरली, असा निर्णय देण्यात आला.

परंतु कायद्याच्या कलम १७९ अन्वये पारित केलेल्या दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजीच्या आक्षेपित आदेशामध्ये, जरी निर्धारण अधिकाऱ्यांनी सन २००६ पासून दिनांक ८ जानेवारी, २००८ या कालावधीत वेळोवेळी झालेल्या आणि याचिकाकर्ती उपस्थित राहिलेल्या मंडळाच्या विविध सभांचा उल्लेख केला असला तरीही, निर्धारण अधिकाऱ्यांनी, याचिकाकर्तीने अभिलेखावर सादर केलेल्या सामग्रीविरुद्ध ( कागदपत्रांविरुद्ध) अशी इतर कोणतीही सामग्री अधोरेखित केली नव्हती, ज्याद्वारे कंपनीच्या कारभारासंदर्भात तिच्याकडून झालेल्या पूर्ण दुर्लक्ष, अपकार्य आणि कर्तव्यभंग यांकरिता तिला दोषी मानता येईल. संचालक या नात्याने याचिकाकर्तीस कंपनीत असलेली मर्यादित भूमिका

आणि संपूर्ण निर्णय प्रक्रिया ही गुंतवणूकदारांनी म्हणजेच जेव्हीसी ची एकमात्र सर्वात मोठी भागधारक असलेल्या के एफ आय कंपनीने नियुक्त केलेल्या संचालकांकडे होती या याचिकाकर्तीच्या भूमिकेच्या दृष्टिकोनातून वित्तीय नियंत्रणाचा अभाव तसेच निर्णयशक्तीचा अभाव हे दर्शवणारी सामग्री अभिलेखावर सादर करणाऱ्या याचिकाकर्तीची, आमच्या मते, कलम १७९ अन्वये कंपनीच्या दायित्वाच्या तिच्यावर असलेल्या भारातून पुरेशा प्रमाणात मुक्तता झाली आहे.

१६. कंपनीच्या कारभारासंदर्भात याचिकाकर्तीकडून पूर्ण दुर्लक्ष, अपकार्य किंवा कर्तव्यभंग झालेली बाब शोधण्यापेक्षा आणि त्याचा परस्पर संबंध देय कराची वसुली न होण्याशी जोडण्यापेक्षा, निर्धारण अधिकाऱ्यांनी याचिकाकर्तीच्या कंपनीच्या कारभारातील सहभागाची बाब, कलम १७९ च्या दायित्वाशी जोडण्याकडे अधिक भर दिल्याचे दिसून येते. याचिकाकर्तीची प्रारंभीच्या भारातून मुक्तता झाल्याने तिचा संबंध याचिकाकर्तीकडून झालेल्या अशा पूर्ण दुर्लक्ष, अपकार्य किंवा कर्तव्यभंग या बाबींशी कसा होऊ शकतो हे निर्धारण अधिकाऱ्यांनी दाखवून देणे आवश्यक होते. **मगनभाई हंसराजभाई पटेल** ( उपरोल्लेखित) या प्रकरणामध्ये असा निर्णय दिला होता की,

> “२०……… अशा प्रकारे अशा बाबी सिद्ध करण्याची जबाबदारी संचालकावर असते.परंतु जेव्हा संचालक, वसुली न होण्याचा संबंध या तीन बाबींशी जोडता येणार नाही असे समजण्यात येण्यासाठी प्राधिकार्यांसमोर कारणे सादर करतो, तेव्हा या संदर्भात प्राधिकार्यांनी अशी कारणे तपासून मग

निष्कर्ष मांडणे आवश्यक होईल. महत्त्वाचे म्हणजे, संचालकाकडून झालेल्या पूर्ण दुर्लक्ष, अपकार्य किंवा कर्तव्यभंग या बाबींच्या प्रश्नाचे कंपनीच्या देय कराच्या वसुली न होण्याच्या संदर्भातून अवलोकन केले पाहिजे.दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, जोवर कर वसूल न होण्याच्या बाबीचा संबंध, त्याच्याकडून झालेल्या एकूण दुर्लक्ष इत्यादी बाबींशी जोडता येणार नाही हे संचालक सिद्ध करीत असेल, तोवर कायद्याच्या कलम १७९ (१ ) अन्वये त्याचे दायित्व उद्भवणार नाही. येथे पुन्हा विधानमंडळाने जाणीवपूर्वक त्याच्याकडून ' केवळ दुर्लक्ष' असा शब्द न वापरता 'पूर्ण दुर्लक्ष' हा शब्द वापरला आहे. जेव्हा कंपनी कार्यरत होती त्यावेळेस याचिकाकर्त्याचे कंपनीच्या कारभारासंदर्भात झालेले दुर्लक्ष याबाबत सहाय्यक आयुक्त यांच्या आक्षेपित आदेशामध्ये चर्चा करण्यात आली आहे आणि त्यावर पूर्णतः लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.याचिकाकर्त्यांकडून झालेल्या पूर्णतः दुर्लक्षा बद्दल, ज्यामुळे कंपनीकडून देय कर वसूल होऊ शकला नाही, त्याबद्दल त्यांनी काहीही नमूद केलेले नाही.अशा प्रकारचा विचार न करता, सहाय्यक आयुक्त हे कंपनीच्या देणींची वसुली संचालकांकडून करण्याचा आदेश देऊ शकत नाही. आम्ही हे स्पष्ट करू इच्छितो की, प्रस्तुत

प्रकरणात कायद्याच्या कलम १७९ अन्वये याचिकाकर्त्याने त्याच्याकडून करवसुलीच्या प्रस्तावा बाबत ठाम निवेदन सादर केले होते. अशा निवेदनामध्ये त्यांनी उचललेली पावले आणि कर वसूल न होण्याचा संबंध त्याच्या पूर्ण दुर्लक्षासोबत जोडता येणार नाही हे दर्शवणारी परिस्थिती नमूद केली होती. हे निवेदन आणि सहाय्यक आयुक्तांसमोर याचिकाकर्त्याने मांडलेल्या बाबी, आदेश पारित करण्यापूर्वी विचारात घेणे आवश्यक होते. विभागाकडे देय असलेला कर भरण्यापेक्षा याचिकाकर्त्याने इतर धनकोंची देणी देण्यास प्राधान्य दिले हा विभागाचा मुद्दाच नाही. याचिकाकर्त्याने कंपनीची मालमत्ता निष्काळजीपणे निरुपयोगी बाबींवर वाया घालवल्यामुळे विभागाला देय असलेल्या कराची वसुली होऊ शकली नाही हा विभागाचा मुद्दा नाही. जीएफएससी ची लिलावाद्वारे विक्री करण्यास याचिकाकर्त्यांनी विरोध केला नाही असे सूचित करणे हा वाद आहे. जीएफएससी ने बऱ्याच प्रयत्नानंतर लिलावाद्वारे मालमत्तेची विक्री केली होती. जीएफएससी ने बऱ्याच प्रयत्नानंतर लिलावाद्वारे मालमत्तेची विक्री केली होती. योग्य किंमत मिळाली नाही हा विभागाचा मुद्दा नाही.”

१७. **राम प्रकाश सिंगेश्वर रूमटा आणि इतर** ( उपरोलेखित) या प्रकरणांमध्ये

अशाच प्रकारचा दृष्टिकोन खाली नमूद केलेल्या शब्दांत व्यक्त करण्यात आला :

"१२. ................ आक्षेपित आदेशाचे स्पष्ट वाचन केले असता असे दिसते की, याचिकाकर्त्याकडून झालेल्या पूर्णतः दुर्लक्ष, अपकार्य किंवा कर्तव्यभंग या बाबींमुळे कंपनीकडून देय असलेला कर वसूल होऊ शकला नाही याबाबत आदेशामध्ये काहीही नमूद केलेले नाही. त्यामुळे, कंपनीची देणी वसूल न होण्यामध्ये संचालकांकडून झालेल्या पूर्ण दुर्लक्ष, अपकार्य किंवा कर्तव्यभंग या बाबींमुळे नव्हे, तर उत्तरवादी यांनी कायद्याच्या कलम १७९ ( १) अन्वये संचालकांविरुद्ध कंपनीच्या कारभारामध्ये त्यांनी केलेल्या तथाकथित दुर्लक्षाबाबत आक्षेपित आदेश पारित केला आणि त्यामुळे प्रश्नांकित मागणीचा मुद्दा उद्भवला आहे. अशा प्रकारे ज्या आधारावर उत्तरवादी यांनी कार्यवाही केली आहे त्यामध्ये कायद्याच्या कलम १७९ अन्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबी विचार न करता लागू केल्याचा दोष दिसून येतो. कंपनीकडून देय असलेल्या कराच्या वसुलीचा संबंध याचिकाकर्त्यांकडून झालेल्या पूर्ण दुर्लक्ष, अपकार्य किंवा कर्तव्यभंग या बाबींशी जोडता येऊ शकतो या निष्कर्षांअभावी, कायद्याच्या कलम

१७९ अन्वये संचालकांकडून सदर वसुली करण्याकरिता कोणताही आदेश दिला जाऊ शकत नाही. वरील चर्चेचा निष्कर्ष असा आहे की, आक्षेपित आदेश हा कायद्याच्या कलम १७९ ( १ ) च्या तरतुदींशी विसंगत असल्याने टिकण्याजोगा नाही........."

१८. वर नमूद केलेल्या न्याय निर्णयांचे तत्व सद्य प्रकरणासही तंतोतंत लागू होते. सद्य प्रकरणामध्येसुद्धा, निर्धारण अधिकाऱ्यांनी कंपनीच्या कारभारासंदर्भात याचिकाकर्तीकडून झालेल्या पूर्ण दुर्लक्ष, अपकार्य किंवा कर्तव्यभंग या बाबींकरता तिला विनिर्दिष्टरीत्या दोषी ठरविलेले नाही. पूर्ण दुर्लक्ष, कर्तव्यभंग किंवा अपकार्य घडल्याची कृती मानता येईल, ज्याद्वारे भविष्यात देय कर वसूल न होण्याची दूरान्वयेही क्षमता नसेल, असा एकही प्रसंग, निर्णय किंवा कृती निर्धारण अधिकाऱ्यांनी अधोरेखित केलेली नाही.

१९. आमच्या मते, दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजीचा आक्षेपित आदेश आणि तशाच समान कारणास्तव उत्तरवादी क्रमांक १ यांनी पुनरीक्षणामध्ये पारित केलेला दिनांक १८ मार्च, २०१९ चा आदेश टिकण्याजोगे नाहीत.

२०. काहीही असो. याचिका मंजूर करण्यात येत आहे. दिनांक २२ डिसेंबर, २०१७ आणि दिनांक १८ मार्च, २०१९ रोजीचे आक्षेपित आदेश रद्द करण्यात येत आहेत.

२१. याचिका निकाली काढण्यात आली असल्यामुळे अंतरिम अर्ज टिकण्यायोग्य नाही आणि परिणामतः तो निकाली काढण्यात येत आहे.

(अभय आहुजा, न्या.) (धीरज सिंह ठाकूर, न्या. )

x-x-x-x

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x